दलित साहित्यातील दलित स्त्रियांची आत्मकथने
एक चिकित्सक अभ्यास

संशोधन आराखडा

श्री. जगदीशप्रसाद झाबरमल टिबरेवाला विश्वविद्यालय
विद्यानगरी झुनझुन राजस्थान
यांच्या

पी.एच्.डी. साठी

विषय :- मराठी

संशोधिका

अनुसया भाऊ अमृतसागर

नोंदणी क्र. १०११०१०९

मार्गदर्शक

डॉ. माधव राजाराम गवई
शिक्षण शास्त्र विभाग

श्री. जगदीशप्रसाद झाबरमल टिबरेवाला विश्वविद्यालय,

Principal
Pandit Rajpati Mishra College of
Education & Research (Bed), Thane

वर्ष - २०१२

'दलित साहित्यातील दलित स्त्रियांची आत्मकथने' १९८३ ते २००८

१.१ प्रस्तावना

एम.ए. प्रथम वर्षाला दलित साहित्य हा विषय निवडला. त्यानिमित्ताने एम. ए. भाग १ व २ या दोन वर्षात दलित साहित्य वाचनात आले. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अभ्यास झाला. प्रथम वर्षाला उर्मिला पवार यांचे अभ्यासाला लावलेले 'आमदान' वाचले आणि दलित साहित्यातील दलित स्त्रियांच्या साहित्याबद्दल उत्सुकता वाढली. त्याचे वाचन सुरु झाले.

मी स्वत: मागासवर्गीय समाजाची स्त्री असल्याने हे साहित्य जवळचे वाटले. माझ्या सारख्या दलित स्त्रीच्या मनाला भिडले. आपल्या आधीच्या पिढीतील स्त्रियांनी जे भोग भोगले ते भोग आपल्या वाटयाला नाहीत म्हणून दलित स्त्रियांच्या आत्मचरित्र/आत्मकथने यांचा सखोल अभ्यास करुन त्या विषयात पी.एच.डी. करण्याची प्रेरणा मला मिळाली. सेवानिवृत्तीनंतर पदवी मिळवून काहीही साध्य करावयाचे नाही. पण झालेली जाणीव स्वस्थ बसू देत नाही. स्वत: बरोबर इतरांचा विकास करावा, स्त्रियाबद्दल आस्था ही धारणा दृढ व्हावी म्हणून त्या भावनेशी एकरुप झाल्यामुळे मानवतावादी धोरणासाठी प्रेरणा मिळली.

दलित स्त्रियांची आत्मकथने ही स्वत:च्या दु:ख जाणीवांची कर्मकहाणी असून टोकाची प्रतिकूल परिस्थिती असताना ही धडपड करत समाजातील अनेक रुढींचा जाच सोसत घरच्या बाहेरच्या पुरुषांच्या त्रासाचा सामना करत शिक्षण घेऊन आपली प्रगती तर केलीच पण आपल्या सामाजिक जात बांधवांच्या हितासाठी उन्नतीसाठी सतत प्रयत्नशील राहिलेल्या या स्त्रियांना पाहून माझे ही मनोबल वाढले. त्यांच्या आत्मकथनांचा सामाजिक अंगाने अभ्यास करुन आपण ही पुढे येणाऱ्या पिढीसाठी, चिमुटभर सामाजिक कार्य करण्याची उर्मी निर्माण झाली म्हणून पी.एच.डी. करण्याचा प्रपंच मांडला.

१.२ दलित साहित्य

कोणत्याही साहित्याचा जन्म होतो. त्या साहित्यिकाचा जन्म कुठल्या जातीत आणि कुठल्या धर्मात झाला याचा इथे काहीही संबंध नाही. शोषण, उपेक्षा, जन्मावरुन उच्चनीच भेद ठरवणाऱ्या रुढी यांचा बिमोड करायला उठलेलं हे दलित साहित्य फक्त माणुसकीला मानतं. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय'

हीच मूळी या साहित्याची मूळ प्रतिज्ञा आहे. वास्तवाशी इमान राखून तिथे पदोपदी जाणवणाऱ्या अन्यायाविरुध्द आवाज उठवणे या ध्येयाने प्रेरित झालेले हे साहित्य जन्मजातच दुय्यम दर्जाचे असा साहित्यिक हिशेब मांडणाऱ्यांना दलित साहित्य हा शब्द खटकणारच.

दलित शब्दाची व्याप्ती लक्षात न घेणाऱ्यांना दलित संमेलन हा सवतासुभा वाटतो. पण ही विचारसरणी नवी नाही. माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, हा विश्वव्यापी विचार घेऊन लढलेल्या आंबेडकरांना हिंदू समाजातल्या अस्पृश्यांचे पुढारी म्हणून एका कुंपणात टाकून देण्यात आले होते. त्यांच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या साहित्यालाही अशाच प्रकारचं लेबल लावून त्यामागील व्यापकता आकुंचित करण्यात आली तर त्यात नवल नाही. बाबासाहेबांसारखा ग्रंथप्रेमी आजच्या काळात लाखात एखादा झाला असेल. पण जीवनातला त्यांचा प्रवास मात्र ग्रंथाकडून ग्रंथाकडे असा झाला नाही. ग्रंथाकडून जीवनाकडे आणि जीवनाकडून ग्रंथाकडे अशी त्यांची परिक्रमा चालली होती. अशी जीवनातून प्रेरणा घेऊन पुन्हा जीवनालाच सार्थ करणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.

१.३ दलित साहित्य म्हणजे काय?

नवसाहित्य चळवळीसकट मराठीतील कोणत्याही साहित्यिक चळवळीने उडाली नसेल इतकी वादाची खळबळ दलित साहित्याने उडाली. नवसाहित्याच्या चळवळीची धार लवकरच सौम्य झाली आणि ती स्थिरावून गेली. परंतु आरंभीच्या काळात दलित साहित्यामुळे उठणारी तीव्र आक्रमक प्रतिक्रिया आता उठत नसली तरी त्याला अजूनही व्यापक प्रमाणात मान्यता मिळालेली नाही. मात्र त्या साहित्याची गंभीर चर्चाचिकित्सा करणारे प्रवक्ते आता पुष्कळ आहेत; आणि चळवळीच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट म्हणजे त्यांच्यापैकी कितीतरीजण स्वत: दलित नाहीत. वादविषय झालेल्या दलित साहित्याच्या मुळाशी दलितांची सामाजिक—आर्थिक परिस्थिती आहे. त्याला राजकीय परिमाण प्राप्त होणे अपेक्षितच होते. पिढयान्‌पिढया, किंबहुना शतकानुशतके, पशूंसारखे लाजिरवाणे जीवन जगावे लागल्याबद्दलच्या साचलेल्या क्रोधाचा उद्रेक म्हणजे हे साहित्य. हा क्रोध कधी कधी बेभान असतो; अविवेकी असतो; पण तो खरा आणि उत्स्फूर्त असतो. या क्रोधाने कविता, कादंबरी आणि आत्मकथन या साहित्य प्रकारांतील काही उत्कृष्ट कलाकृतींना जन्म दिला आहे.

दलित स्त्रियांची आत्मकथने

१) ''माज्या जल्माची चित्तरकथा''

लेखिका :— **सौ. शांताबाई कृष्णाजी कांबळे (आत्मकथन)**

आवृत्ती दुसरी :— ६ डिसेंबर १९९०

प्रकाशक :— उषा वाघ

सुगावा प्रकाशन

८६१/१ सदाशिव पेठ,

पुणे — ४११०३०.

अवलोकन / Review :—

शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतर शांताबाईंनी आत्मकथन लिहिले. त्यांचे आत्मकथन अनेकविध कारणानी वेगळे उतरले आहे. एक गोष्ट निश्चित सगळीकडे दलित जीवनाचा अंत:पट तोच आहे. तीच उपेक्षा, मानहानी, गुहाजीवन, नरकप्राय वेदनांचे जिणे दलित स्त्रीचे जीवन. म्हणजे दलितामधील दलित गुलामांचे गुलाम हे आत्मकथन वाचनाने भारतीय स्त्रीची गुलामी दूर होण्यास दालित्य दूर होण्यासाठी समाजाची मानसिकता थोडी जरी बदलली तरी खूप झाले म्हणावे लागेल.

२) मिटलेली कवाडे

लेखिका :— **मुक्ताबाई सर्वगोड**

वर्ष :— १९८३ प्रथमावृत्ती

प्रकाशक :— सौ. यशोदा सोनार

चेतश्री प्रकाशन अमळनेर

अवलोकन / Review :—

मुक्ताबाईना दलित लेखिका म्हणून संबोधलेले आवडत नाही. त्या म्हणतात त्या जन्मल्या ते वातावरण दलित नव्हते. त्यांनी समाजकार्य केले. सरकारी सवलती दलितापर्यंत पोचत नाहीत. कारण त्याची माहिती नसते. त्या सवलती त्यांनी गरिबांना सांगितल्या. समाज सेवेतील उणिवा आणि गरजा व दलितांचे दयनीय जीवन वाचकापुढे मांडणे हाच त्यांचा लेखनाचा हेतू आहे. दलित लेखिका म्हणण्यापेक्षा त्या स्वत:ला समाजसेविका म्हणतात. त्यांच्या कथनातील प्रांजळपणा आणि अनुभव मनाला स्पर्शून विचारांना चालना देणारा आहे. त्यांच्या प्रत्येक कथेचा रस्ता दलित वस्तीतूनच गेलेला आहे.

३) तीन दगडाची चूल

लेखिका :— **श्रीम. विमल दादासाहेब मोरे**

आवृत्ती :— प्रथमावृत्ती सप्टेंबर २०००

प्रकाशक :— सुनिल अनिल मेहता

किंमत :— रु. १५०/—

ISBN 81 – 7766 – 0365 -5

अवलोकन / Review :—

लेखिकेचा जन्म अज्ञान अंधश्रध्देच्या गर्तेत अडकलेल्या रुढी परंपरांनी, गुरफटलेल्या भटक्या विमुक्त जातीतील गोंधळी समाजात झाला. बालपण अन्याय, अत्याचार, आगतिकता अवहेलना सहन करीत गेलेले. स्त्रियांच्या वाटयाला येणारे नरकप्राय्य जीवन त्यांच्याही वाटयाला आले. दादासाहेब मोरेच्या सहजीवनामुळे त्यांच्यातील लाज, भित्रेपणा जाऊन त्यांना स्वतंत्र विचार करता आला तसेच त्यांचे स्वत:चे व्यक्तीमत्व घडले. साहित्य आणि सामाजिक चळवळीशी संबंध आला. गोंधळी जमातीला स्त्रियांचे जीवन त्यांना जसे भावले, अनुभवले, भोगले तसेच शब्दबध्द करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

३) मरण कळा

लेखिका :— **सौ. जनाबाई कचरु गिऱ्हे**

आवृत्ती :— प्रथम आवृत्ती जुलै १९९२

मूल्य :— रु. ४५/—

प्रकाशन :— सौ. नंदिनी तु. गवळी

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.

अवलोकन / Review :—

सौ. जनाबाई कचरु गिऱ्हे हया भटक्या विमुक्त स्त्रियांच्या विदारक जीवनचरित्राच्या आत्मकथेच्या गोपाळ समाजाच्या स्त्री मनाचे, तिच्या भावभावनाचे, सुखदु:खाचे, कळ्ळोल लेखिकेने चित्रित केले आहेत. शब्दांनी क्षणभर मौन धरावे व नम्र व्हावे अशी ही साहित्यकृती आहे.

५) दलित स्त्री आत्मकथने

लेखिका :— **डॉ. श्यामल गरुड**

प्रकाशक :— यशश्री प्रकाशन

Category :— आत्मकथन, दलित साहित्य, स्त्रीविषयक

अवलोकन / Review :—

दलित साहित्यात १९८० पासून दलित स्त्रीचा आत्मस्वर आत्मकथनाच्या अंगाने सशक्तपणे पुढे आला. त्यात दलित पुरुष आत्मकथनांइतका निडरपणा नव्हता. पण विद्रोहाची एक वेगळीच संमत भाषा होती. भोगून झालेलें सारं पचवून, स्वत:च्या

वेदनेची मिमांसा इथल्या उतरंड व्यवस्थेच्या अनुषंगाने करत या स्त्रिया लिहित्या झाल्या. सात, आठ दलित स्त्रियांनी आपली जीवनगाथा उलगडली.

६) **स्त्री साहित्याचा मागोवा**

संपादक :— **डॉ. मंदा खांडगे**

डॉ. लिला दीक्षित

डॉ. अरुणा ढेरे

विनया खडपेकर

मार्गदर्शन :— डॉ. सरोजिनी वैद्य

अवलोकन / Review :—

सावित्रीबाई फुले चरित्र. महाराष्ट्राची आद्य शिक्षिका असे ज्यांना म्हटले आहे. अशा समाजभूषण कै. सौ. सावित्रीबाई फुले यांचे आत्मचरित्र शान्ता रघुनाथ बनकर यांनी लिहिले आहे. हे छोटेसे चरित्र, माहितीपूर्ण व वाचनीय असून स्त्रीला शिक्षणाच्या वाटेवर आणून सोडण्यासाठी समाजाचा छळ निर्धाराने सोसणाऱ्या व्रती स्त्रीची आदराने दखल घेणारे म्हणून महत्त्वाचे आहे.

७) **स्त्री साहित्याचा मागोवा - आत्मचरित्र (खंड १ला)**

संपादिका :— **डॉ. अरुणा ढेरे**

मार्गदर्शन :— डॉ. सरोजिनी वैद्य

अवलोकन / Review :—

स्त्रीला पुरुषावेगळे स्वतंत्र अस्तित्व नाही. किंबहुना म्हणजे अवघ्या शंभर वर्षात स्त्रियांच्या कर्तबगारीमुळे त्यांच्या जागृत अशा अस्तित्व भावामुळे निश्चित झालेल्या समाजात झाले. विचारवंत, सुधारक, द्रष्टे लोक ते स्त्री प्रश्नासाठी चळवळी उभारणारे क्रियाशील कार्यकर्ते यांच्यामुळे ती गोष्ट जशी घडून आली तशीच ती दुसऱ्या बाजूने स्त्री शिक्षणाने आणि स्वतःच्या अस्मितेचा शोध घेणाऱ्या कर्तबगार स्त्रियांनीही घडवून आणली. स्त्री जीवन आणि स्त्री मन या दोहोंचा आरसा म्हणून या आत्मचरित्रांचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

८) **चार दलित स्त्रियांची आत्मकथने - एक अभ्यास**

पदवी परीक्षेसाठी शोध निबंध.

एस.एन.डी.ट. महिला विद्यापीठ, मुंबई — १९९२

संशोधिका :— **सौ. संध्या वि. शहापुरे**

अवलोकन / Review :—

आत्मचरित्र लेखन हे ''मी'' मधून स्फुरण पावते आणि ''मी'' भोवतीच केंद्रीत होते. मीचा संबंध सृष्टीशी आणि समाजाशी अटलपणे येतच असतो. त्यामुळे हया मीचे स्वरुप, त्याची व्याप्ती आणि मर्यादा जाणून घेणे व ते चित्रित करण्याची पराकाष्ठा करणे हेच आत्मचरित्र लेखनाचे अंतिम उद्दिष्टय होय. आत्मकथनामागे मुख्य हेतु व्यक्तीमत्त्वाच्या शोधाचा आत्मशोधनाचा असला पाहिजे. दलित साहित्याची प्रेरणा डॉ. आंबेडकरांचे साहित्य व विचारप्रणाली आहे.

९) महिला धोरण - २००६ ते २०११ (माहिती पुस्तिका)

अर्थात

महिला सक्षमीकरणाची सनद

सांगली जिल्हा परिषदेचे प्रकाशन (खाजगी वितरणासाठी)

प्रकाशक :— श्री. लक्ष्मीकांत देशमुख
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सांगली

अवलोकन / Review :—

२१व्या शतकात एकूण लोकसंख्येच्या निम्मा घटक असणाऱ्या महिलांची उपेक्षा करुन चालणार नाही. त्यांना त्यांच्या हक्काचे स्थान देणे ही काळाची गरज आहे. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई, महर्षी कर्वे, शाहू महाराज यांसारख्या द्रष्टया पुरुषांनी महिलांसाठी प्रचंड कार्य करुन ठेवलेले आहे. त्यानुसार जर आपली वाटचाल झाली नाही तर येणाऱ्या भावी काळाशी ती प्रतारणा ठरेल.

१०) मराठी वाङ्.मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे एक चिकित्सक अभ्यास.

संपादिका :— **सौ. प्रतिमा कणेकर**

मार्गदर्शक :— डॉ. उषा देशमुख

अवलोकन / Review :—

आत्माविष्कारासाठी शब्दांचे माध्यम नुकतेच हाती आलेली स्त्री ''स्व:चरित्र'' ''पतीचरित्र'' किंवा ''आमच्या आयुष्यातील कांही आठवणी'' म्हणून लिहू लागते. तेव्हां तिच्या लेखनाला नेमका आत्मचरित्राचा घाट केव्हां व कसा प्राप्त होतो. याचा शोध घेतांना साहित्य विषयक प्रश्नांची उत्तरे सापडतील असा विश्वास संपादिकेला वाटतो. वाङ्.मयापेक्षा आत्मचरित्र हा वाङ्.मय प्रकार सत्य जीवन दर्शन देऊ शकणारा आहे.

११) स्त्रियांची आत्मचरित्रे (डॉ. शोभा पाटील) स्त्रीवादी शोध

मल्हार प्रकाशन :— ३११/३ ससाणे नगर, हडपसर, पुणे

प्रथमावृत्ती २००२

लेखिका :— **डॉ. शोभा विश्वास पाटील**

अवलोकन / Review :—

दलित समाजातील सगळयाच स्त्रियांच्या आत्मकथनाला दोन परिमाणे दिसतात. दलित समाजाचे जीवन आणि स्त्री म्हणून दुय्यमत्वाचे जीवन. अमानवी वागणुकीचे दु:ख आणि टोचणी या स्त्रियांच्या मनात अधिकच आहे. हे निश्चितच! म्हणूनच त्या स्वजीवन दर्शन घडवीत नाहीत. त्यापेक्षा आपल्या समाजाचे, जातीचे जीवन त्यातील जीवन पध्दती, दारिद्रय— रुढी परंपरा, अंधश्रध्दा—अज्ञान यांचे समग्र दर्शनच त्या घडवितात.

१२) मला उध्वस्त व्हायचंय

लेखिका :— **मलिका अमर शेख**

प्रकाशक :— मॅजिस्टीक प्रकाशन

अवलोकन / Review :—

मला उध्वस्त व्हायचंय मधून अभिव्यक्त झालेले स्त्रीमन अस्मितेच्या जाणीवेने तळपणारे तेजस्वी व बंडखोर दिसते. आपल्या स्वप्नातील जोडीदाराची प्रतिमा पुसली गेल्यावर ती केवळ हताश होत नाही. सर्व सांस्कृतिक संकेत झुगारुन प्रतिकारार्थ सिध्द होते. स्त्रीमनाचे हे रुप नवे आहे.

१३) दलितांची आत्मकथने - संकल्पना व स्वरुप

लेखक :— **डॉ. वासुदेव मुलाटे**

आवृत्ती :— जानेवारी १९९६ पहिली

प्रकाशिका :— सौ. उषा मुलाटे

प्रकाशन :— स्वरुप प्रकाशन.

अवलोकन / Review :—

दलितांच्या आत्मकथनामुळे मराठी साहित्याचे दालन संपन्न झाले आहे. विविध जाती जमातीचे स्तर त्यामुळे मुखर झाले. जीवन आणि साहित्य यांचा अन्योन्य संबंध असतो. कोणत्याही साहित्याच्या निर्मितीची बीजे जीवनातील वास्तव्यात असतात आणि जीवनातील जडणघडणीत साहित्याचाही वाटा असतो. साहित्य ही मानवी मनाची निर्मिती आहे. दलित आत्मकथनातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे रुप इतके अनन्यसाधारण आणि विलक्षण आहे की, तो अर्थपूर्ण अनुभव आत्मचरित्राचा परंपरागत घाट स्वीकारुन व्यक्त होत नाही.

१४) दलित समीक्षेचे स्वरुप

लेखक :— **डॉ. शत्रुघ्न जाधव**

प्रकाशक :— प्रतिभास प्रकाशन

आवृत्ती :— मे २००३ प्रथम आवृत्ती

अवलोकन / Review :—

१९२० ची सामाजिक परिस्थिती. टिळकांचा मृत्यु व गांधीजीकडे आलेले काँग्रेसचे नेतृत्व. त्यात त्यांचा धार्मिक आध्यात्मिक संतत्वाचा भारतीय जनतेवर खोलवर परिणाम याच सुमारास डॉ. आंबेडकरांनी सामाजिक सुधारणेला व अस्पृश्यांच्या उन्नतीच्या कार्यास सुरुवात केली. महाराष्ट्र ही डॉ. आंबेडकरांची कर्मभूमी. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण मागासवर्गीयांचा राजकारणात सहभाग, मागासवर्गीयांना राजकीय शैक्षणिक नोकरी विषयक सवलती, त्या सवलतींना संवैधानिक संरक्षण हया साऱ्या बाबी दलितांच्या मानसिक, बौध्दिक प्रबोधनासाठी डॉ. बाबासाहेबांनी केल्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूळमंत्र दिला.

१५) दलित आत्मचरित्रे : साहित्य आणि समाज

लेखक :— **डॉ. रमेश वा. धोंगडे**

मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.

प्रथमावृत्ती — १४/१/१९९२

अवलोकन / Review :—

दलित साहित्याच्या प्रेरणेमागे व या समाजाच्या संघटनेमागे डॉ. आंबेडकरांचे तत्वज्ञान, परिश्रम आहेत. हे कोणीच दलित कार्यकर्ता, पुढारी, नेता किंवा दलित विचारवंत नाकारणार नाही. त्यामुळे साहित्याचा विचार करताना समाज रचना तपासताना आंबेडकरांच्या ध्येय धोरणांची विचारांची दखल आवश्यक आहे. आक्रमण आणि उपरोध ही डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक लेखनाची महत्त्वाची अंगे आहेत.

१६) शोध बाई माणसाच्या जिण्याचा

लेखिका :— **शुभदा देशमुख**

अक्षर प्रकाशन प्रथमआवृत्ती ४/१०/०४

प्रकाशिका :— सौ. उषा मुलाटे

प्रकाशन :— स्वरुप प्रकाशन.

अवलोकन / Review :—

स्त्रीची पत, स्त्रीचे राजकारण, स्त्रीचे शिक्षण, कुटुंब संस्थेचे कार्य, समाजात तिची किंमत, घरात तिची किती झाडाझडती परित्यक्तांचे प्रश्न, भूमिका आणि चळवळ व्याख्या, संकल्पना, शरीर विक्रय करणाऱ्या स्त्रिया प्रश्न केवळ नैतिकतेचा नसून भौतिक विकासाचाही, जातीय अत्याचाराला बळी दलित स्त्रिया जात धर्माचे राजकारण, मुस्लीम स्त्रियांचे प्रश्न या सर्व स्तरातील स्त्रियांच्या मानसिक, शारीरिक व सामाजिक अंगाने या पुस्तकात अनेके लेखिकांनी साकल्याने आपले विचार मांडलेले आहेत.

१७) माझी मी

लेखिका :— **यशोधरा गायकवाड**

प्रकाशन :— ग्रंथाली

आवृत्ती :— पहिली २१ एप्रिल २००७

अवलोकन / Review :—

मागासवर्गीय समाजात ज्या स्त्रिया शिकल्या त्या अतिशय पराकोटीच्या अडचणी व हाल अपेष्टांना तोंड देत. संकटांना सामोरी गेल्या. यशोधरा गायकवाड याही त्यापैकीच एक आहेत. स्वातंत्र्यापूर्वी १९३८ चा त्यांचा जन्म त्यामुळे जातीयवादाच्या चटक्यात त्यांचे बाळपण होरपळून गेलेले आहे. अनेक अडचणी पार करुन शिक्षण घेऊन शिक्षक झाल्यानंतर स्वतःच्या पायावर उभे राहिल्यानंतर त्यांचे भोग संपले नाहीत. दुसऱ्या बाईच्या नादी लागून यशोधराबाईच्या संसाराची फरपट त्यांच्या पतीने केली.

१८) मी वनवासी

लेखिका :— **सिंधुताई सकपाळ**

पहिली आवृत्ती :— १६ ऑक्टों. १९८८

प्रकाशन :— सौ. सिंधुताई सकपाळ

अवलोकन / Review :—

दुर्दैवाच्या भोवऱ्यात अचानक सापडलेल्या जीवनाच्या जळत्या निखाऱ्यावरुन चालणाऱ्या नियतीच्या जबडयात हात घालून दात मोजणाऱ्या रणरागिनी म्हणजे सिंधूताई सकपाळ. दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकून मरणाच्या दारात जाणाऱ्या सिंधूताई आपल्या बाळाच्या रडण्याने भानावर येऊन असा जीवनक्रम सुरु करतात की, त्या आज हजारोंची माता होऊन समाजसेवेचे वृत्त हाती घेऊन मातृत्वाचे ऋण अनेक अनाथावर करीत आहेत.

१९) कोल्हाटयाचं पोरं

लेखक :— **किशोर शांताबाई काळे**

प्रकाशन :— ग्रंथाली प्रकाशन.

पहिली आवृत्ती :— २५ नोव्हेंबर १९९४

अवलोकन / Review :—

कोल्हाटी समाजातील स्त्रियांच्या वाटयाला आलेला भोगवटा म्हणजे नरक यातना येथे पुरुष मंडळी आयत बसून खातात—पितात आणि त्यांच्या मायबहिणी त्यांची हौसमौज — खाणंपिणं भागविण्यासाठी नाचगाणं करतात. मन विदीर्ण करुन

सोडील अशी किशोर शांताबाईची कहाणी आहे. लावायला बापाच नाव नाही म्हणून तिथं किशोर आईचे नाव लावतो.

२०) अंतःस्फोट

लेखिका :— **प्रा. कुमुद पावडे**

प्रकाशक :— शंकरराव अु. हातोले

मुद्रक :— नाना डेंगळे साधना प्रेस

प्रथमावृत्ती :— १ मार्च १९८१.

अवलोकन / Review :—

दलित जीवन, दलित स्त्री या संबंधीचे घेतलेले अनुभव विविध लेखांत लेखिकेने व्यक्त केले आहेतच. परंतु दलित जीवन व दलित स्त्रीकडे पाहण्याचे जे अनेक दृष्टीकोन व भूमिका आहेत. त्यांचा परामर्शही त्यांनी घेण्याचा प्रयत्न केला आहे. पुष्कळदा लेखिकेने आपले विचार परखडपणे मांडले आहेत. काही विचार असे असतात की, ते गुळगुळीतपणे मांडून चालत नाहीत. त्यातील धग तसे लिहिण्यास प्रवृत्तच करीत नाहीत.

२१) आयदान

लेखिका :— **उर्मिला पवार**

प्रकाशन :— ग्रंथाली प्रकाशन

पहिली आवृत्ती ५ डिसेंबर २००३.

अवलोकन / Review :—

लेखिकेची आई आयदान करायची. तिच्या हाती सतत फिरणारे आयदान आणि लेखिकेचे लेखन यांची वीण एका अर्थानं सारखी दिसते. इतर दलित स्त्रियांच्या वाटयाला आलेले दालित्य गरीबी लेखिकेच्याही वाटयाला आली आहे. पण धर्मांतराचा काळ, धर्म, धर्मांतर म्हणजे काय? ते कशासाठी करायचं. करायला सांगणारी व्यक्ती कोण, तिचा परिचय काय याची जाणीव, ज्ञान होण्याइतके वय नसतानाही धर्मांतर झाले आणि शिक्षणाने ''स्व''ची ओळख झाली.

२२) जिणं आमुचं

लेखिका :— **बेबी कांबळे**

प्रकाशक :— रवींद्र कुलकर्णी

दुसरी आवृत्ती :— ९ मे १९९०

अवलोकन / Review :—

लेखिकेचा पिंड ललित लेखिकेचा नसून समाजशास्त्रज्ञाचा आहे. स्वतःच्या समाजाचे डोळसपणे आणि सहानुभूतीने केलेले निरीक्षण. हया पुस्तकात लिहून ठेवल्यामुळे. समाजशास्त्रज्ञ आणि इतिहासकारांच्या दृष्टीने जिणं आमुचं ही अमोल

खाण ठरेल. आषाढ महिन्यात देव—देव घरोघरी अंगात येण्याच्या प्रथा पोतराज सोडण्याची प्रथा, रेडयाची जत्रा याबद्दल इतरत्र कुठेही उपलब्ध नसलेली माहिती समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने अत्यंत मोलाची आहे.

२३) जगायचं प्रत्येक सेकंद

लेखिका :— **मंगला केवळे**

ग्रंथाली प्रकाशन क्र. १३२.

पहिली आवृत्ती ६ डिसेंबर १९९६.

अवलोकन / Review :—

आपल्या पतीच्या आठवणी लिहिताना लेखिकेचा प्रांजळपणा दिसून येतो. स्कूटर अपघातात पतीचे निधन झाल्यानंतर बातमी समजली तेव्हा पतीवरील प्रेमाने त्या वैधव्य स्वीकारायला त्यांचे मन तयार नव्हते. अतिशय प्रतिकुल परिस्थितीत बूट पॉलीश करुन शिक्षण पूर्ण करणारे एम.बी.बी.एस. डॉ. होणारे त्यांचे पती हे समाजावर व निसर्गावर प्रेम करणारे होते. त्यांचे जीवन हे अहंकार शून्य होते.

२४) माणूसपणाच्या वाटेवर

लेखक :— **डॉ. राम पुनियानी प्रदीप देशपांडे**

प्रकाशन :— भाष्य प्रकाशन.

अवलोकन / Review :—

स्त्रियांच्या प्रश्नाच्या व्यापक स्वरुपाची वैज्ञानिक पध्दतीने आणि मानवतावादी दृष्टीकोनांतून मांडणी केलेली आहे. या अभ्यासपूर्ण मांडणीमुळे हे लिखाण परिवर्तनवादी चळवळीच्या कार्यकर्त्याबरोबरच स्त्रियांच्या प्रश्नाचे व्यापक स्वरुप समजून घेऊ इच्छिणाऱ्या सर्वानाच उपयुक्त आहे. याच वाचकांना आत्मशोधही आढळू शकेल.

२५) रमाई

लेखक :— **यशवंत मनोहर**

प्रकाशक :— युगसाक्षी प्रकाशन नागपूर

आवृत्ती :— २० वी २८ सप्टेंबर २००९

अवलोकन / Review :—

'रमाई' हे यशवंत मनोहर यांच्या प्रज्ञाशील प्रतिभेला पडलेले एक सुंदर स्वप्नच आहे. 'रमाई' मध्ये यशवंत मनोहरानी करुणेचे महाकाव्य फुलविलेले आहे. 'रमाई' म्हणजे मनाला अंतर्मुख आणि उन्नत करणारा अश्रूंचा लावण्यसोहळा दु:ख, त्याग, प्रगाढ समजुतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता, अथांग प्रज्ञान आणि मृत्यु यांचे

सर्जनशील निर्माण म्हणजे 'रमाई' अंतर्मुखतेलाही खोल अंतर्मुख करणारी आणि उजेडाच्या वाटेवर सुगंध होऊन चालणारी सौंदर्य पौर्णिमा म्हणजे 'रमाई'.

२६) हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती

लेखक :— **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

प्रकाशक :— सुगावा प्रकाशन.

पुनर्मुद्रण :— जून २००९

अवलोकन / Review :—

हिंदुस्थानातील हिंदु स्त्रियांच्या उन्नतीला व अवनीतीला कारण कोण? याचा उहापोह डॉ. बाबासाहेबांनी या पुस्तकांत केला आहे. आर्य समाजातून शुद्र आणि स्त्रियों यांचा बौध्द धर्म स्विकारण्यासाठी एकसारखा मोठा लोंढा वाहात होता. शुद्र आणि स्त्रिया आर्य समाजाचे आणि धर्माचे आधारस्तंभ होते. ते आधारस्तंभ कोसळल्यावर आर्य समाज आणि धर्म नष्ट होण्याच्या मार्गाला लागले होते. तेव्हा हा लोंढा थांबविण्यासाठी मनूला कायद्याचा मोठा बांध तयार करणे भाग पडले. मनूने स्त्रियांवर बंधने लादून त्यांचे जीवन कायमचे खुरटून टाकले.

२७) समर्थ स्त्रियांचा इतिहास

लेखिका :— **प्रा. आशालता कांबळे**

प्रकाशक :— हिराप्रकाशन रमाकांत जाधव

प्रकाशन क्र. ५

आवृत्ती :— प्रथम आवृत्ती ऑक्टोंबर २००७.

अवलोकन / Review :—

धार्मिक आणि सामाजिक बंधनाखाली स्वत्व चिरडून बसलेल्या आमच्या तळागळातल्या आया—बहिणींना स्वत्वाची जाणीव होऊ देणे. शतकानुशतके अबला होऊन जगणारी स्त्री स्वसामर्थ्याने उठू दे आणि स्वयंसिध्दा होण्यासाठी समाजातील दोन टक्के स्त्रियांना जरी ही ताकद मिळाली तरी हया लेखनाचे सार्थक होईल असे वाटते.

२८) आम्हीही इतिहास घडवला (आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचा सहभाग)

लेखिका :— **उर्मिला पवार, मीनाक्षी मून**

प्रकाशक :— उषा वाघ, सुगावा प्रकाशन.

ISBN – 81- 86182 – 49- 7

आवृत्ती :— प्रथमावृत्ती १० ऑक्टोंबर १९८९.

अवलोकन / Review :—

स्त्री वर्गात जागृती झाली तर अस्पृश्य समाजाची फार मोठी प्रगती घडून येईल. सामाजिक दुर्गुण नाहीसे करण्यात त्यांची फार मोठी सेवा आहे. स्त्रियांनी

किती प्रमाणात प्रगती केली यावरुन दलित समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

२९) स्त्री युगाची पहाट

लेखिका :— **प्रा. माई देशमुख**

आवृत्ती :— प्रथमावृत्ती नोव्हेंबर १९९४

प्रकाशक :— आयु. सीमाताई आठवले
अध्यक्षा — मानव विकास मंच

अवलोकन / Review :—

सदर पुस्तकात लेखिकेने प्रत्यक्ष धोरणात समाविष्ट विकासात्मक बाबी आणि हे धोरण तयार होत असतानाची शिल्पकाराची विचारधारा सर्वसामान्य स्त्रीला आकलन होईल असे विवेचन आढळते. स्त्री शिकल्याशिवाय तिला गमावलेला अधिकार मिळविण्याची इच्छा होणार नाही. १९९४ साली राज्य शासनाने महिला धोरण जाहीर केले आणि राजकारण सत्ताकारण यात जास्तीत जास्त महिलांचा सहभाग झाला.

३०) समाजद्रोही उच्चभ्रूंची दलित आत्मकथने

लेखक :— **प्रा. डॉ. प्रकाश मोगले, नांदेड**

आवृत्ती :— प्रथम आवृत्ती १ ऑगस्ट, २००९

प्रकाशक :— डॉ. अशोक गायकवाड, कौशल्य प्रकाशन

अवलोकन / Review :—

वरील पुस्तकात धर्मघातकी व समाजहित घातकी विचार वर्तन व लेखन कसे आहे ते दाखवले आहे. नरेंद्र जाधव यांनी आमचा बाप व आम्ही मध्ये धर्मांतरानंतरही दगड, पितळेच्या देवांचे म्हणजे हिंदू धर्माची कास सोडलेली नाही. अक्करमाशी व राघववेळ मध्ये आपल्याच समाजातील स्त्रियांची अब्रू वेशीवर मांडून पुरस्कार मिळविण्यात लेखकाने धन्यता मानली आहे.

३१) बाई माणूस

लेखिका :— **करुणा गोखले**

प्रकाशक :— दिलीप माजगावकर, राजहंस प्रकाशन.

ISBN 978 – 81 – 7434 – 488 - 5

आवृत्ती :— प्रथम आवृत्ती फेब्रुवारी २०१०

अवलोकन / Review :—

समाजामध्ये जगताना स्त्रीला प्रत्येक ठिकाणी तडजोड करावी लागते. पड खावी लागते. स्त्रियांनी सूज्ञ होऊन तर्कनिष्ठ राहून आपण सुध्दा आधी 'मानव'

आहोत आणि एवढेच नाही तर 'समान मानव' आहोत हे सांगायला हवे. त्यांच्या सांगण्याला स्त्री मुक्तीवाद म्हणायला हवे.

३२) सक्षम मी

संपादन :— **शुभदा चौकर**

प्रकाशक :— परम मित्र पब्लिकेशन्स

आवृत्ती :— प्रथम आवृत्ती २९ फेब्रुवारी, २००८

अवलोकन / Review :—

१९९३ मधील घटना दुरुस्तीने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांत ३३.०३% आरक्षण मिळाले. स्वाभाविकच राजकारणाची कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या नसलेल्या अशा असंख्य महिला राजकारणात उतरल्या. पहिल्या कार्यकाळात त्या रबर स्टम्प बनल्या. पुढे पुढे त्यांनी आरोग्य शिक्षण स्वच्छता असे मुलभूत मुद्दे प्राधान्याने आणि गांभीर्याने हाताळून महिलांनी ग्रामीण राजकारणाला नवे रुप दिले.

३३) पंचायत कारभारणी

महिला राजसत्ता आंदोलन महाराष्ट्र

संपादन :— **विजय वळंजू**

प्रकाशक :— महिला राजसत्ता आंदोलनाकरीता रिसोर्स ॲन्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट

अवलोकन / Review :—

बाईचे सामाजिक नागरिकत्व, बाईचं जिणं, राजकीय नागरिकत्व — राजकारण, स्थानिक संस्थामध्ये मिळालेली संधी, पंचायत राज व महिला, ग्रामनियोजन व अंदाजपत्रक, ग्राम पंचायत दप्तर, कारभारातील खाचाखोचा नेतृत्वाचे विविध पैलू, आंदोलन व पंचायत महिला आघाडी व प्रेरणा, गैरसमज व अंधश्रध्दा याबाबतचे खरे वास्तव स्पष्ट करणे.

३४) पन्नास टक्के राजसत्ता

सत्ताकारणी महिलांचा विशेषांक

संशोधिका :— **डॉ. मंजुळा भारती, डॉ. अमिता भिडे**

संपादन :— संतोष बिखटकर

मुद्रण :— प्रकाश दळवी अथर्व प्रिंटस्

नॅशनल प्लॅटफॉर्म फॉर प्रमोटींग

डिसेंट्रलायझेशन — नवी दिल्ली

यांच्या पुढाकाराने प्रकाशित.

अवलोकन / Review :—

महिलांची आता या सत्ताकेंद्रात केवळ प्रवेश करण्याची इच्छा आहे असे नव्हे. तर त्या सत्ताकेंद्रात दिर्घकाळ राहून काम करु इच्छितात. महिलांची राजकीय समज विकसित झालेली असूनही मुख्य राजकीय प्रवाहात आणि निर्णय प्रक्रिया सहभागी होताना त्यांना अनेक अडथळयांचा सामना करावा लागतो. राजकारभारात प्रभावी काम करण्याकरीता महिलांना राजकीय दृष्टया स्वावलंबी बनवणे ही काळाची गरज आहे.

३५) शिक्षण संक्रमण

महिलादिन विशेषांक

आंतरराष्ट्रीय महिला दिन - ८ मार्च

संपादक :— **श्री. शहाजी ढेकणे**

प्रकाशक :— श्री. शहाजी ढेकणे
सचिव, राज्य मंडळ, पुणे.

अवलोकन / Review :—

खास महिला दिनासाठी प्रसारित केलेला महिला विशेष अंकामध्ये महिलांच्या प्रश्नांचा उहापोह केलेला आहे. महिला सक्षमीकरणाची खरी गरज आहे. महिलांना आर्थिक दृष्टया सक्षम करुन भागणार नाही. याकरीता सामाजिक बदल होणे आवश्यक आहे. आर्थिक मदतीबरोबर जीवनकौशल्याचे प्रशिक्षण दिल्यास खऱ्या अर्थाने त्यांचे सक्षमीकरण होऊ शकेल.

३६) ॲज आय सी

लेखिका :— **डॉ. किरण बेदी**

अनुवाद :— माधुरी शानभाग

प्रकाशक :— मेहता पब्लिशिंग हाऊस.

अवलोकन / Review :—

डॉ. किरण बेदी यांचे हे पुस्तक म्हणजे समाजातील प्रत्येक स्तरातील व जातीतील वर्गवादीतील स्त्रीचे डोळस वास्तव, बोलके चित्रण आहे. तिच्या मनाचा व तनाचा त्यांनी तळ गाठून लेखन केले आहे.

३७) लोकराज्य

महिला विशेषांक

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

मुख्य संपादक :— **विजय नाहटा**

संपादक :— माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,
मुंबई — ४०० ०३२.

अवलोकन / Review :—

खास महिला दिनांच्या निमित्ताने महिला बालकल्याण मंत्री वर्षा गायकवाड, कर्तबगार महिला सनदी अधिकारी, मालिनी शंकर, कविता गुप्ता, वंदना कृष्णा आणि महाराष्ट्राच्या महिला बालविकास आरोग्य आणि माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांनी महिलांच्या अनेक प्रश्नाबाबत आपले मत व्यक्त केलेले आहे. शासनाची धोरणे सांगून महिला सक्षमीकरणाची गरज सांगितली आहे.

३८) प्राचीन अर्वाचीन

भारतीय स्त्री आणि हिंदू कोडबिल

लेखक :— **डॉ. अनिल सूर्या**

प्रकाशक :— उषा वाघ, सुगावा प्रकाशन

आवृत्ती :— प्रथमावृत्ती १५ ऑक्टोंबर, २०१०

अवलोकन / Review :—

प्राचीन काळी स्त्रियांची स्थिती काय होती व आर्वचित काळी काय स्थिती आहे हे दाखवताना मनूने स्त्रियांच्यावर जे अत्याचार केले, जी बंधने आणली तिला जगताना जखडून टाकले. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षाच्या अंध:कारातून हिंदू स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी हिंद कोडबिल तयार केले आणि डॉ. आंबेडकरांना घटनेपेक्षाही महत्त्वाचे वाटत होते.

संशोधनाची उद्दिष्टे

१. दलित साहित्याच्या निर्मितीच्या पाठीमागची कारणमिमांसा शोधणे.

२. दलित साहित्यातील मानसिकतेचा शोध घेणे.

३. दलित साहित्य आणि दलित महिला यांच्यातील साहित्य संबंधाचा शोध घेणे.

४. दलित साहित्यातील दलित महिलांच्या दृष्टीकोनाचा शोध घेणे.

५. दलित साहित्यातील दलित महिलांच्या आत्मकथनांचा शोध घेणे.

६. दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचा दलित समाजावर पडलेल्या प्रभावाचा शोध घेणे.

७. परिणामांचा अभ्यास करणे.

संशोधन कार्यवाही पध्दती

कोणतेही संशोधन कार्य करतांना संशोधन पध्दतीची गरज व निवड ही महत्त्वाची ठरते. सदर संशोधिकेने सदरचा विषय यासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्याचे ठरविले. कारण सदरचा विषय हा **दलित स्त्रिया आत्मकथने** हा ऐतिहासिक पध्दतीवर अवलंबून असल्यामुळे आणि त्याचे फक्त दस्तऐवज पुस्तक रुपाने वा ग्रंथ रुपाने अथवा संशोधन पेपर इ. द्वारे कार्य करावयाचे असल्यामुळे सदरची पध्दती उपयुक्त ठरली आहे. त्या दृष्टीने संशोधिकेने ऐतिहासिक दस्तऐवजाच्या आधारे दलित साहित्याच्या अभ्यासासाठी १९८३ ते २००८ पर्यंतच्या एकूण २५ वर्षाचा कालखंड सहहेतुक निवडला आहे. यामध्ये संशोधिकेने दलित साहित्यातील फक्त दलित स्त्रिया आत्मकथनाचाच विचार केला असल्यामुळे दलित स्त्रियांची आत्मकथनांची एकंदरीत नांदीच आपणास एकत्रित करावयाची असल्यामुळे दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून त्यांनी त्यांच्या मांडलेल्या वेदनांची मिमांसा सदर संशोधिकेला करावयाची आहे. यासाठी संशोधिकेने एकूण १० स्त्री आत्मकथनांचा विचार करुन त्यांच्या पुरताच मर्यादित केला आहे. १९८३ ते २००८ या कालखंडाव्यतिरिक्त संशोधिकेने विचार केलेला नाही.

संशोधनाच्या पध्दती खालीलप्रमाणे :—

१. ऐतिहासिक संशोधन पध्दती (Historical Method)

२. वर्णनात्मक सर्वेक्षण संशोधन पध्दती (Descriptive Servey Research Method)

३. प्रायोगिक संशोधन पध्दती (Experimental Method)

वरील संशोधन पध्दतीची माहिती खालीलप्रमाणे :—

१. ऐतिहासिक संशोधन पध्दती (Historical Method)

ऐतिहासिक संशोधन ही सामाजिक शास्त्रामध्ये तथ्य संकलनाच्या अनेक पदध्तीमध्ये जुनी व उपयुक्त पध्दत आहे. ऐतिहासिक संशोधनाचे उद्दिष्ट वर्तमान घटनांचा अर्थ लावण्याच्या दृष्टीने संदर्भ म्हणून भूतकाळातील घटनांचा मागोवा घेणे हे आहे.

ऐतिहासिक संशोधनाचे स्वरुप विषद करतांना **'हान्स गर्थे'** लिहितात की, ''प्रत्येक सामाजिक संरचनेच्या प्रतिकृतीत सामाजिक इतिहासात्मक

बदलाचा प्रतिकृतीत सामाजिक इतिहासात्मक बदलाचा प्रतिध्वनी निहित असतो. सामाजिक संरचनेत आलेले बदल इतिहासात समाविष्ट केले जातात. ''

ऐतिहासिक संशोधनाचे स्वरुप पुढील बाबींवरुन स्पष्ट होईल.

१. गतकालीन घटनांचा अभ्यास करणे.

२. इतिहास संशोधन म्हणजे केवळ राजकीय इतिहास नव्हे तर त्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक बाबींचाही अभ्यास करणे.

३. घटनांचा चिकित्सक मार्गाने अभ्यास करणे.

४. उपलब्ध माहितीचा अर्थ निश्चित करणे.

५. केवळ वर्तमान समजून न घेता भविष्यकालीन स्थितीचे पूर्वज्ञान प्राप्त होणे.

६. भूत, वर्तमान व भविष्य यांचे घनिष्ट संबधाची चिकित्सा करणे.

७. इतिहास संशोधकांचा नवीन दृष्टीकोन जाणून घेणे.

या पदध्तीमुळे भूतकाळातील शैक्षणिक समस्यांचे शास्त्रीय पध्दतीने अध्यापन करता येते. अशा ऐतिहासिक संशोधनातून भूतकाळातील संबंधित विषयाची निव्वळ माहिती मिळत नसते. तर वर्तमान परिस्थिती सुधारण्यासाठी व भविष्याचे नियोजन करण्यास अशा शैक्षणिक संशोधनाचा उपयोग होतो.

संदर्भ सूची

- **आगलावे, प्र.**(२०००), "संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे" विद्या प्रकाशन, नगापूर. प्र.आ.
- **आंबेडकर, बा.** (२००९), "हिंदु स्त्रियांची उन्नती आणि अवनती", पुनर्मुद्रण. सुगावा पकाशन, पुणे—३०.
- **कणेकर, प्र.** (१९८७), "मराठी वाड्.मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे एक चिकित्सक अभ्यास". संपादक, सौ. प्रतिभा कणेकर, मुं.
- **कांबळे, आ.** (२००७), "समर्थ स्त्रियांचा इतिहास" हिरा प्रकाशन, डोंबिवली (पूर्व) प्र.आ.
- **कांबळे, बे.** (१९९०), "जिणं आमुचं" मानसन्मान प्रकाशन पुणे, दु.आ.
- **काळे, कि.** (१९९४), "कोल्हाट्याचं पोरं". ग्रंथाली प्रकाशन मुं. प्र.आ.
- **कुंडले, म.** (२००५), "संशोधन मार्गदर्शिका" (भाग—१), नाशिक, यशवंतराव चव्हण, मुं. विद्यापीठ, पकाशन प्र.आ.
- **कुंडले, म.**(२००५), "संशोधन कार्यवाही व अहवाल लेखन" (भाग—२), यशवंतराव चव्हाण म. मुक्त विद्यापीठ प्रकाशन, प्र.आ.
- **केवळे, मं.** (१९९६), "जगायचं प्रत्येक सेकंद, "ग्रंथाली प्रकाशन, मुं.प्र. आ..
- **खांडगे, मं.**(२००२), "स्त्री साहित्याचा मागोवा" (खंड १ला) संपादन डॉ. अरूणा ढेरे, डॉ. लीला दिक्षित, विनया खडपेकर, प्रकाशन साहित्य प्रेमी भगिनी मंडळ पुणे, प्र.आ.
- **गरूड, श्या.** (२०१०), "दलित स्त्री आत्मकथने, "यशश्री प्रकाशन, नागपूर, प्र.आ.
- **गायकवाड, य.** (२००७), "माझी मी," ग्रंथाली प्रकाशन मुं. प्र. आ.

- **गिन्हे, ज.(१९९२)**“मरण कळा”, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ.
- **गोखले, क. (२०१०),** “बाईमाणूस” राजहंस प्रकाशन पुणे, प्र.आ.
- **चौफेर, शु.(२००८),** “सक्षममी”, परममित्र पब्लिकेशन्स, नौपाडा ठाणे, प्र.आ.
- **जाधव, श. (२००३),** “दलित समिक्षेचे स्वरूप” प्रतिमास प्रकाशन, परभणी प्र.आ.
- **जोशी, म.(१९९९)श** “संशोधन अहवाल लेखन पद्धती”, यशवंतराव चव्हाण म.मुं. विद्यापीठ प्रकाशन, नाशिक चौदावी आ.
- **ढेकणे, श. (२०११)** “शिक्षण संक्रमण”, ‘‘महिला दिन विशेषांक” संपादक — श्री. शहाजी ह. ढेकणे. अंक ३रा वर्ष ५६ वे.
- **देशमुख, मा. (१९९४),** “स्त्रीयुगाची पहाट”, प्रकाशक—आयु. सीमाताई आठवले, अध्यक्ष मानव विकास मंच मुं.प्र.आ.
- **देशमुख,ल. (२०११),** “महिला धोरण २००६ ते २०११” (माहिती पुस्तिका) अर्थात महिला सक्षमीकरणाची सदन, सांगली जिल्हा परिषदेचे प्रकाशन, सांगली.
- **देशमुख, शु. (२००४),** “शोध बाई माणसाच्या जिण्याचा” अक्षर प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.
- **घोंगडे, र. (१९९२),** “दलित आत्मचरित्रे: साहित्य आणि समाज” मधुराज पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ.
- **नाहटा, वि. (२०११),** “लोकराज्य” महिला विशेषांक—माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय, मुं.अंक १२ वा.
- **पवार, ३ (२००३),** “आयदान”, ग्रंथानी प्रकाशन, मुं.प्र.आ.
- **पवार, ३, मू न, मि.(१९८१),** “आम्हीही इतिहास घडवला” सुगावा प्रकाशन पुणे ३०, प्र.आ.

- **पाटील, शो. (२००२),** “स्त्रियांची आत्मचरित्रे'' मल्हार प्रकाशन, हडपसर, पुणे. प्र.आ.
- **पावडे, कु. (१९८१),** “अंत:स्फोट”, आनेंद प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.
- पुनियानी, रा. प्रदीप, दे. (२०११), “माणूसपणाच्या वाटेवर” भाष्य प्रकाशन, मुं.प्र.आ.
- **बेदी, वि. (२००९),** “ॲजआयसी”, सुनील अनिल मेहता, पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ.
- **भारती, मं. (२००९),** “पन्नास टक्के राजसत्ता”, सत्ताकारणी महिलांचा विशेषांक, संपादन — संतोष बिरवटकर प्रकाश दळवी, अथर्व प्रिंटस्, ठाणे.
- **मनोहर, य. (२००९),** “रमाई” युगसाक्षी प्रकाशन, नागपूर २२ विसावी आवृ.
- **मोगले, प्र. (२००९),** “समाजद्रोही उच्चभ्रूंची दलित आत्मकथने”, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.
- **मोरे, वि. (२०००)** “तीन दगडाची चूल” सुनिल अनिल मेहता पब्लिशिंग, पुणे. प्र.आ.
- **मुळाटे, वा (१९९९),** “दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप”, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.
- **वळंजू, वि. (२००६)** “पंचायत कारभारणी” महिला राजसत्ता आंदोलन, महाराष्ट्र महिला राजसत्ता आंदोलनाकरीता रिसोर्स ॲन्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट नवी मुंबई ४०००६१४.
- **शहपुरे, सं. (१९९२),** “चार दलित स्त्रियांची आत्मकथने एक अभ्यास”, सौ. संध्या शहापुरे, प्रबंध

- **शेख, म. (१९८४),** "मला उध्वस्त व्हायचयं" मॅजिस्टीक प्रकाशन मुं.प्र. आ.
- **सकपाळ , सिं. (१९८८),** "मी वनवासी" लेखिका सौ. सिधुताई सकपाळ. प्र.आ.
- **सर्वगोड, मुं.(१९८३),** "मिटलेली कवाडे" चेतश्री प्रकाशन, अमळनेर, प्र. आ.
- सूर्या, अ.(२०१०),"प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोडबिल" सुगावा प्रकाशन पुणे, प्र.आ.

Research Scholar

3/11/2011